सत्यमेव जयते
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे -४११००१
E-mail: cevt1.trti@gmail.com
Website: trti.maharashtra.gov.in
दुरध्वनी - ०२०-२६३३०८५४

**जा.क्र./आसंप्रसं/२०२६/स्प.प.वि./पो.व सै./प्र.सं.सू./का.०४/२५०५** **दि.२५/०५/२०२६**

## पोलीस व सैन्य भरती स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित प्रशिक्षण संस्थाकरीता महत्वाच्या सूचना.

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत सदर सर्वंकष धोरणाच्या अनुषंगाने या कार्यालयामार्फत सन २०२५-२६ पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने लाभार्थी निवडीकरीता ऑनलाईन सामायिक चाळणी प्रवेश परीक्षा (CET) घेण्यात आली. त्याप्रमाणे दि.०८ एप्रिल, २०२६ रोजी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर जिल्हानिहाय गुणवत्ता व प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार सदरच्या पूर्व प्रशिक्षण योजनेकरीता पात्र उमेदवारांना त्यांच्या इच्छेनुसार नामनिर्देशित (Empanel) केलेल्या प्रशिक्षण संस्था निवडीकरीता पसंतीक्रम देण्याकरीता या कार्यालयामार्फत दि. २२ मे, २०२६ रोजी ऑनलाईन विकल्प पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले आहे. तरी सदरच्या योजनेकरीता नामनिर्देशित करण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थांसाठी महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे –

१. प्रशिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याकरीता विद्यार्थ्यांची दिशाभूल होईल अशा स्वरूपाच्या कोणत्याही जाहिराती सामाजिक माध्यमांद्वारे (Social media) किंवा इतर कोणत्याही मार्गाने प्रसारित करू नये.
२. प्रशिक्षण संस्थांना नामनिर्देशित केलेल्या ठिकाणी प्रशिक्षण वर्ग राबविणे बंधनकारक आहे. प्रशिक्षण संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना याबाबत चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देऊ नये.

तरी, उक्त १ व २ नुसार या कार्यालयास या संदर्भात काही तक्रार/तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित प्रशिक्षण संस्थेवर/संस्थांवर योग्य ती उचित कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व प्रशिक्षण संस्थांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

**स्वा./-**
(मंजिरी मनोलकर, भा.प्र.से.)
**आयुक्त,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**